MHGA070015062025

**दिवाणी न्यायाधिश (कनिष्ठ स्तर), अहेरी, जिल्हा- गडचिरोली यांचे न्यायालयात**

(पिठासिन अधिकारी श्री. एस.एम.एच. शाहिद)

**एम.जे.सी. क्रं. १२५/२०२५ (ई-फाईलिंग प्रकरण)**

**अर्जदार** :- १. राजन्ना चिन्ना गेडाम,
वय ७८ वर्षे, व्यव. शेती,
२. नारायण चिन्ना गेडाम,
वय ७७ वर्षे, व्यव. शेती,
३. शंकर चिन्ना गेडाम,
वय ७६ वर्षे, व्यव. शेती,
४. मल्लेश चिन्ना गेडाम,
वय ५४ वर्षे, व्यव. शेती,
सर्व रा. खमनचेरू, ता. अहेरी, जि. गडचिरोली.

**विरूध्द**

**गैरअर्जदार** :- निरंक

**उपस्थीती** :-

.......................................................................................................

अर्जदारां तर्फे विद्वान अधिवक्ता - सौ. स्वाती एस. जैनवार,
गैरअर्जदार निरंक

.......................................................................................................

# निशाणी क्रमांक ०१ खालील आदेश

## (दिनांक ३० मार्च २०२६ रोजी पारीत)

अर्जदारांनी भारतीय वारसाण कायदा, १९२५, चे कलम ३७२ अन्वये वारसाण प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. मय्यत रामय्या चिन्ना गेडाम, यांचे दिनांक ३०/११/२०२५ रोजी अविवाहित निधन झाले. अर्जदार क्रं. १ ते ४ हे मय्यत रामय्या चिन्ना गेडाम, यांचे भाऊ आहेत. मय्यत रामा चिन्ना गेडाम व अर्जदार क्रं १ ते ४ यांची आई आज रोजी हयात नाही. अर्जदारांना मय्यत रामय्या चिन्ना गेडाम, यांचे नावे महाराष्ट्र ग्रामीण बॅक, शाखा अहेरी येथील खाते क्रं. ६६९१६०२४५४६ मधील जमा रक्कम रु. ६,३३८/-(रक्कम सहा हजार तिनशे अळत्तीस रूपये फक्त) तसेच बॅक ऑफ महाराष्ट्र, शाखा अहेरी येथील खाते क्रं. ६०१५८५२१४०४ मधील जमा रक्कम रू. २०,७५५.५६/-(रक्कम विस हजार सातशे पंचावन

रूपये फक्त) मिळण्याकरीता अर्जदार हे मय्यत रामय्या चिन्ना गेडाम, यांचे वारस असल्याबाबत वारसाण प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे अर्जदारांनी सदर अर्ज दाखल केला आहे.

२. अर्जदारचे अर्जावर जाहीरनामा प्रसिध्द करण्यात आला तसेच दैनिक "नवराष्ट्र" वृत्तपत्रामधून निशाणी क्रमांक १५ प्रमाणे दिनांक १२ फेब्रुवारी २०२६ रोजी जाहीर नोटीस देण्यात आली. अर्जदारांनी आपल्या कथनाच्या समर्थनार्थ निशाणी क्र. ०९ प्रमाणे अर्जदार क्रं. १ चे प्रतिज्ञापत्र दाखल केले. तसेच, ग्रामपंचायत, खमनचेरू यांनी निर्गमित केलेले मय्यत रामय्या चिन्ना गेडाम, यांचे मृत्युप्रमाणपत्र निशाणी क्रं. १०. ग्रामपंचायत, खमनचेरू यांनी निर्गमित केलेले वारसाण प्रमाणपत्र निशाणी क्रं. ११. मय्यत रामय्या चिन्ना गेडाम, यांचे आधार कार्ड निशाणी क्रं. १२. महाराष्ट्र ग्रामीण बॅक व बॅक ऑफ महाराष्ट्र येथील मय्यताचे खात्याचे विवरण व खाते पुस्तीका अनुक्रमे निशाणी क्रं. १३ व १४ वर आहेत.

३. <u>अर्जदार क्रं. १ ते ४ हे मय्यत रामय्या चिन्ना गेडाम, यांचे भाऊ आहेत. पुढे असे की, मय्यत रामय्या चिन्ना गेडाम हे अविवाहीत मय्यत झाले व मय्यत रामय्या चिन्ना गेडाम यांची आई आज रोजी हयात नसल्याने मय्यत रामय्या चिन्ना गेडाम यांना वर्ग-१ चे कुणीही वारस नाहीत.</u> अर्जदार क्रं. १ ते ४ शिवाय मय्यत रामय्या चिन्ना गेडाम, यांना इतर कोणीही वारस नसल्याचे प्रथमदर्शनी पुराव्यावरुन दिसुन येते. वारसाण प्रमाणपत्र देण्याबाबत ईतर कोणीही हरकत न घेतल्यामुळे अर्जदार क्रं. १ ते ४ हे मय्यत रामय्या चिन्ना गेडाम, यांचे वर्ग-२ चे वारस आहे अशी मान्यता देण्यात यावी असे या न्यायालयाचे मत आहे. सदर प्रकरण हे ई-फाईलिंग प्रणाली व्दारे दाखल करण्यात आले असुन प्रकरणाचे कोणतेही कागदपत्रे ( मुळ किंवा सत्यप्रति ) न्यायालयात उपलब्ध्द नाहीत. म्हणुण <u>*" माननिय मुंबई उच्च न्यायालय यांचे ई-फाईलिंग नियम २०२२ " च्या नियम १०(३) मधील निर्देशानुसार संबंधित वकिलांनी प्रकरणाचे मूळ दस्त व कागदपत्रे त्यांचे कडे जतन करुण ठेवण्याचे निर्देश देण्यात येते.*</u> प्रकरणाच्या निकाला करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजुर.

२. अर्जदार क्रं. १. राजन्ना चिन्ना गेडाम, अर्जदार क्रं. २. नारायण चिन्ना गेडाम, अर्जदार क्रं. ३. शंकर चिन्ना गेडाम, व अर्जदार क्रं. ४. मल्लेश चिन्ना गेडाम, हे मय्यत रामय्या चिन्ना गेडाम, यांचे वर्ग-२ चे वारस आहे अशी मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर वारसाण प्रमाणपत्र मय्यत रामय्या चिन्ना गेडाम, यांचे नावे महाराष्ट्र ग्रामीण बॅक, शाखा अहेरी येथील खाते क्रं. ६६९१६०२४५४६ मधील जमा रक्कम रु. ६,३३८/- (रक्कम सहा हजार तिनशे अळत्तीस रूपये फक्त) तसेच बॅक ऑफ महाराष्ट्र, शाखा अहेरी

येथील खाते क्रं. ६०१५८५२१४०४ मधील जमा रक्कम रू. २०,७५५.५६/-(रक्कम विस हजार सातशे पंचावन रूपये फक्त) एकुण रक्कम रूपये २७,०९३.५६/- (सत्ताविस हजार त्र्यान्नव रूपये छप्पन पैसे) ची उचल करण्याकरीता जारी करण्यात येते.

अर्जदाराचे नावे वारसान प्रमाणपत्र जारी करण्याकरीता अर्जदारा कडुन रक्कम रूपये २७,०९३.५६/- (सत्ताविस हजार त्र्यान्नव रूपये छप्पन पैसे) करीता लागणाणी स्टॅम्प ड्युटी घेवुन वारसाण प्रमाणपत्र अर्जदारांचे नावे निर्गमित करण्यात यावे.

४. प्रकरणातील संबंधीत वकिल व पक्षाकारांना निर्देशित करण्यात येते की, “ माननिय मुंबई उच्च न्यायालय यांचे ई-फाईलिंग नियम २०२२ ” च्या नियम १०(३) मधील निर्देशाची पुर्तता करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SAJIDUZZAMAN SHAHID
Date: 2026.04.01 10:42:54 +0530

अहेरी
दि. ३०/०३/२०२६

(एस.एम.एच. शाहीद)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अहेरी.